BDM

(K)

21/1/2023
2/3/2023
10/4/2023
Closed
MAS
Disposed

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

# Maharashtra State Human Rights Commission (M S H R C) Mumbai

Allotted to Court No. : 1/ 2/ 3

DOCKET SHEET

**DOCKET SHEET**

*SUO MOTU CASE NO: 420/13/16/2023*

News item appeared in English News Paper "THE TIMES OF INDIA" On 14.1.2023, in respect of "Prof at NSS camp made students strip, stand in cold", in Marathi News Paper "LOKMAT" on 14.1.2023, in respect of "शिबिरात प्राध्यापकाने केली विद्यार्थ्यांना मारहाण" and in Marathi News Paper "MAHARASHTRA TIMES" on 13.1.2023 in respect of "शिबिरात विद्यार्थ्यांना अर्ध नग्न करून मारहाण"

SUMMARY

लोकमत Page No-2
14-1-2023

# शिबिरात प्राध्यापकाने केली विद्यार्थ्यांना मारहाण

## सोमय्या कॉलेजातील धक्कादायक प्रकार

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : के.जे.सोमय्या विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना प्राध्यापकाकडून अमानुष वागणूक आणि मारहाणीचा प्रकार नुकताच समोर आला आहे. डहाणू येथे शिबिरासाठी गेले असता एका प्राध्यापकाने या विद्यार्थ्यांना अर्धनग्न करून मारहाण केली. इतकेच नाही तर अर्धनग्न अवस्थेत त्यांना कडाक्याच्या थंडीत दोन तास उभे ठेवण्यात आले. दरम्यान महाविद्यालयाच्या जनसंपर्क विभागाकडून घटनेला दुजोरा देण्यात आला आहे.

शिबिरातून परत आल्यानंतर विद्यार्थ्यांनी झाल्या प्रकाराची तक्रार महाविद्यालयाकडे नोंदवूनही अद्याप प्राध्यापकांवर कोणतीही कारवाई झालेली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या तक्रारी आता विद्यार्थी संघटनांकडे मांडल्या आहेत. मात्र भविष्यातील कारवाईच्या भीतीमुळे कोणीही विद्यार्थी लेखी तक्रार देण्यास तयार नसल्याचे संघटनांनी स्पष्ट केले. राष्ट्रीय युथ काँग्रेसचे निखिल कांबळे यांनी मुख्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तसेच गृहमंत्री यांना पत्रे लिहून हे प्रकरण पॉक्सो अंतर्गत येत असल्याने याची गंभीर दखल घ्यावी आणि स्थानिक पोलिसांना तक्रार दाखल करण्याच्या सूचना द्याव्यात, अशी मागणी केली आहे. शिवाय याप्रकरणी विशेष समितीची नेमणूक करून चौकशीचे आदेश द्यावेत, अशीही मागणी केली आहे. तसेच महाविद्यालयीन प्रशासनाकडून प्राध्यापकांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला जात असून या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अमोल मातेले यांनी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू आणि प्र-कुलगुरू याना केली आहे.

### नियमानुसार कारवाई

विद्यार्थ्यांसोबत घडलेल्या प्रकरणासंदर्भात महाविद्यालयीन प्रशासनाने जनसंपर्क विभागामार्फत घटनेला दुजोरा दिला आहे. दरम्यान नियम आणि अटीप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही केली जाणार असल्याचे महाविद्यालयीन प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

महाराष्ट्र टाइम्स
13-1-2023 Page 1 & 10

# शिबिरात विद्यार्थ्यांना अर्धनग्न करून मारहाण

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

**मुंबईतील प्रतिष्ठित कॉलेजच्या प्राध्यापकाकडून छळ**

मुंबईच्या पूर्व उपनगरातील एका नावाजलेल्या कॉलेजच्या जवळपास १३ ते १४ विद्यार्थ्यांसोबत अमानुष प्रकार घडल्याची जोरदार चर्चा आहे. डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात डहाणू येथे शिबिरासाठी गेले असता कॉलेजच्या एका प्राध्यापकाने या विद्यार्थ्यांना अर्धनग्न करून मारहाण केली. इतकेच नाही तर अर्धनग्न अवस्थेत त्यांना कापरे भरणाऱ्या थंडीत दोन तास उभे करून ठेवण्यात आले. याबाबत प्राचार्यांकडे तक्रार करूनही अद्याप प्राध्यापकावर कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याने विद्यार्थी प्रचंड दहशतीखाली कॉलेजमध्ये वावरत असल्याचे कळते. विश्वसनीय सूत्रांनी याबाबत 'महाराष्ट्र टाइम्स'ला माहिती दिली.

या प्रतिष्ठित कॉलेजने डहाणू येथील एक गाव दत्तक घेतले असून या गावामध्ये डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात राष्ट्रीय सेवा योजनेचे (एनएसएस) शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये कॉलेजमधील वेगवेगळ्या वर्षात शिकणारे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. गावामध्ये एकाच ठिकाणी परंतु वेगवेगळ्या खोल्यांमध्ये विद्यार्थी आणि शिक्षकांची राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती. सूत्रांनी दिलेल्या (पान १०वर)

## बैठकीत प्राचार्यांकडून आश्वासन

शिबिराहून परतल्यानंतर विद्यार्थ्यांनी घडलेला प्रकार कॉलेजच्या प्राचार्यांकडे मांडल्याचे समजते. यावर प्राचार्य आणि इतर प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांसोबत तासभर चर्चा केली. 'मारहाण करणारे प्राध्यापक माफी मागत आहेत, त्यांना माफ करून विषय सोडून द्या' असे काहींनी सांगितले. मात्र विद्यार्थ्यांनी हा पर्याय अमान्य करून संबंधित प्राध्यापकावर कारवाईची मागणी लावून धरली. मात्र आश्वासन देऊनही या प्राध्यापकावर कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याने विद्यार्थी संतापले आहेत.

# कडाक्याच्या थंडीत अर्धनग्न करून मारहाण

(पान एकवरून)

माहितीनुसार, २९ डिसेंबर रोजी त्या ठिकाणी पोहोचल्यावर १३ विद्यार्थी झोपण्यासाठी एका खोलीमध्ये जमा झाले. रात्री साडेअकराच्या सुमारास प्राध्यापक आले आणि लाइट बंद करून झोपण्याचे फर्मान सोडून निघून गेले. बाजूच्या खोलीतील वरिष्ठ सहकारी आल्याने त्यांनी मोबाइलवर काही वेळ गाणी ऐकली, गप्पा मारल्या आणि नंतर सर्वजण झोपले.

काही वेळातच एक प्राध्यापक आले आणि त्यांनी जोरजोरात दरवाजा ठोकायला सुरुवात केली. शिव्या देत आरडाओरड करत हे प्राध्यापक दरवाजावर हाताने, लाथेने मारत होते. प्राध्यापकांचे हे रौद्ररूप पाहून विद्यार्थी घाबरले. दरवाजा उघडण्याची कुणाचीही हिंमत होईना. एका विद्यार्थ्याने पुढाकार घेऊन दरवाजा उघडताच एक जोरदार बुक्का त्यांनी या विद्यार्थ्याला लगावला. काय झाले सर? असे हटकताच ते अधिकच संतापले. लाथेने, पायातील चपलेने प्राध्यापक सर्वच विद्यार्थ्यांना मारत सुटले. ते काहीही ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत नव्हते. विद्यार्थ्यांना त्यांनी अंगावरील कपडे काढण्यास सांगितले. विद्यार्थ्यांनी यासाठी नकार देताच त्यांना पुन्हा अमानुष मारहाण केली. यावरून सर्व विद्यार्थ्यांनी अंतर्वस्त्रे वगळता अंगावरील सर्व कपडे काढले. बाहेर कमालीची थंडी असताना अशा स्थितीत प्राध्यापकांनी सर्व विद्यार्थ्यांना खोलीबाहेर मोकळ्या जागेत नेले. विद्यार्थी थंडीत कुडकुडत प्राध्यापकांना माफ करण्याची विनंती करीत होते, मात्र त्यांनी सुमारे दोन तास विद्यार्थ्यांना अशाच स्थितीत उभे ठेवल्याचे सूत्रांनी सांगितले.

सकाळी विद्यार्थ्यांनी शिबिरासाठी आलेल्या इतर प्राध्यापकांना ही घटना सांगितली. मात्र सुरुवातीला विद्यार्थ्यांच्या बाजूने बोलणारे इतर प्राध्यापकही काही वेळाने मारहाण करणाऱ्या प्राध्यापकाचीच बाजू घेऊ लागले. पहिल्याच रात्री असा त्रास देण्यात आल्याने उर्वरित दिवस कसे काढायचे, या विचाराने हे विद्यार्थी घरी जाण्याची परवानगी मागू लागले. मात्र कॉलेजचे नाव खराब होईल, तुमची बदनामी होईल, असे घाबरवून त्यांना शांत करण्यात आले. मात्र एका विद्यार्थ्याने आजीच्या आजारपणाचे कारण सांगून निघून सुटका करून घेतली.

Case No. 420/13/16/2023

615/CR/2023

THE TIMES OF INDIA

14-1-2023 Page 4

INWARD 615/CR/2023
RECEIVED DT. 18/01/2023
CLERK Aarti.
REGISTRAR N.T. 18-1-2023

# Prof at NSS camp 'made students strip, stand in cold'

Times News Network

**Mumbai:** An NSS camp organised by a leading city college turned out to be a nightmare for some students when one of the teachers accompanying them allegedly thrashed them and made them strip and stand out in the cold late into the night as punishment. The seven-day camp was organised at Dahanu by the NSS unit of K J Somaiya College of Science and Commerce for 70 students. Around four teachers, two male and two female, had accompanied them on the camp, which started on December 29.

A spokesperson of the college said that the incident was reported to them and they are investigating the matter. "We will take all the adequate action required as per rules and regulations," said the spokesperson, refusing to divulge any further information.

A source said the students were allegedly being punished for staying awake late in the night on the first day of the camp. On December 29, the students retired to their allotted rooms at around 11.30 pm and were chatting and listening to music. A little past midnight, the teacher allegedly came to their room and knocked heavily till the students opened the door. He then allegedly started punching the students, thrashed them with slippers and even kicked some and asked them to strip. Students claimed they were made to lie on the floor with only bare minimum clothes even as the teacher continued to thrash them. The teacher then allegedly asked them to stand out in the cold. There were 12 students in the room, one of whom was traumatised and left the camp the next day.

Ever since the incident came to light, students' organisations have been seeking stringent action against the teacher and against the college for inaction. Amol Matele from NCP said the students had complained after returning from the camp, and the college did not take cognisance of their complaint. Nikhil Kamble from the Indian Youth Congress sought an FIR against the professor and an investigation by a special committee.

# MAHARASHTRA STATE HUMAN RIGHTS COMMISSION

9, Hajarimal Somani Marg, Opp. Chhatrapati Shivaji Maharaj Terminus, Mumbai – 400 001

Tel : 22092857 Email:- court1-mshrc@mah.gov.in

## KKT/Suo Moto Case No.–420/13/16/2023

| | | |
|---|---|---|
| Name of Respondent | :1 | The Commissioner of Police<br>Mumbai |
| | 2 | The Dy. Commissioner of Police<br>Zone – V<br>Mumbai |
| | 3 | The Principal Secretary<br>Education Department<br>Mantralaya, Mumbai |
| Date | : | **16th January 2023** |
| Coram | : | **Justice K.K. Tated, Chairperson** |

## P R O C E E D I N G

Not on board. Taken on board.

1. We noticed news appeared in following Newspapers :

I. English News Paper Times of India dated 14.01.2023 on page 4 "Prof at NSS camp 'made students strip, stand in cold'"

II. Marathi News Paper Maharashtra Times dated 13.01.2023 on page 1 and 10 with heading "शिबिरात विद्यार्थ्यांना अर्धनग्न करुन मारहाण; कडाक्याच्या थंडीत अर्धनग्न करुन मारहाण"

III. Marathi News paper Lokmat dated 14.01.2023 on Page 2 "शिबिरात प्राध्यापकाने केली विद्यार्थ्यांना मारहाण; सोमय्या कॉलेजातील धक्कादायक प्रकार"

2. It is stated in the above mentioned news that concerned Professor tortured the students in N.S.S. Camp. Inspite of that neither Police Authority nor School Authority has taken any action against the said Professor. Apart from that even Police Authority failed and neglected to register F.I.R. to that instance.

3. Considering these facts Commission has decided to take Suo Moto Complaint as per Section 12 of the Protection of Human Rights Act, 1993. Hence, the following order is passed:

a) Office is directed to issue summons to the Commissioner of Police, Mumbai , Dy. Commissioner of Police, Zone – V, Mumbai and Principal Secretary, Education Department, Mantralaya, Mumbai calling upon them to hold fact finding inquiry and submit report immediately but in any case on or before 31.01.2023.

b) **Matter to appear on board before Division Bench of Justice K.K. Tated, Chairperson and Shri. Bhagwantrao D. More, Member in Court No.1 on 31st January 2023 at 11.00 a.m.**

**(Justice K. K. Tated)**
**Chairperson**

**MAHARASHTRA STATE HUMAN RIGHTS COMMISSION**

9, Hajarimal Somani Marg, Opp. Chhatrapati Shivaji Maharaj Terminus, Mumbai – 400 001

Tel : 22092857 Email:- court1-mshrc@mah.gov.in

# DIVISION BENCH
# Suo Motu Case No.– 420/13/16/2023

| | | |
|---|---|---|
| Name of Respondent | : | Commissioner of Police<br>Mumbai<br><br>Dy. Commissioner of Police,<br>Zone V, Mumbai<br><br>Principal Secretary,<br>Education Department<br>Mantralaya, Mumbai |
| Date | : | 10th April **2023** |
| Coram | : | **Justice K.K. Tated, Chairperson**<br>**M.A.Sayeed, Member** |

## ORDER

**(Per: M. A. Sayeed, Hon'ble Member)**

Present suo motu case is arising out of the various news articles published in Times of India, Maharashtra Times, Lokmat dated 13th & 14th January, 2023, relating to an unfortunate incident of high handedness on the part of Professor of NSS camp who is alleged to have humiliated and tortured the students. It is further reported that despite reporting the matter to the police, no action was taken. Accordingly summons were issued to the stakeholder departments pursuant to which reports Ex. 'B' and Ex. 'C' came to be placed on record.

2. We have gone through these reports carefully and it emerges that the enquiry revealed that no such incident as reported in the news article had occurred. The relevant portion of the report dated 01.03.2023 submitted by DCP Zone VI, Chembur concluded as under:

"1. सोमय्या कॉलेजचा कॅम्प धुंदलवाडी, डहाणु, पालघर येथे गेल्यानंतर दि.29/12/2022 रोजी कॅम्पमध्ये सहभागी मुलांनी शिस्तीचे पालन न केल्याने प्राध्यापक श्री. अमित मोरे या कॅम्प प्रमुखांनी मुलांना शिक्षा केल्याचे दिसून येत आहे.
2. शिबीरामध्ये विदयार्थ्यांना मारहाण केल्या प्रकरणी कॉलेज प्रशासनाने दिनांक 14/01/2023 रोजी बैठक घेऊन प्राध्यापक श्री. अमित मोरे यांना प्रस्तुत प्रकरणाची चौकशी पुर्ण होईपर्यंत निलंबित केले आहे. सदर प्रकरणाची दखल मुंबई विदयापीठाने घेऊन, चौकशीकरीता कमिटी तयार करून चौकशी पुर्ण केली आहे व त्याबाबतचा अहवाल प्रलंबित आहे.
3. नमुद घटनेच्या अनुषंगाने संबधित सर्व विदयार्थ्यांचे जबाब नोंद केले असता, त्यांना प्राध्यापक श्री. अमित मोरे सरांनी दिलेल्या शिक्षेचे प्रमाण अधिक वाटत असल्याचे दिसुन येते. त्यांना शिवीगाळ करून थंडीत उघडे उभे केले म्हणुन कॉलेज प्रशासनाने त्यांचेवर कारवाई करावी अशी अपेक्षा करून तोंडी तक्रार केली आहे. त्यांची प्राध्यापक श्री. अमित मोरे यांचे विरोधात कायदेशीर तक्रार नसल्याचे जबाबात सांगितले आहे.
4. प्राध्यापक श्री. अमित मोरे सरांनी विदयार्थ्यांना लाथा बुक्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली व त्यांना उघडे करून दोन तास थंडीत उभे केले असे विदयार्थ्याचे म्हणणे आहे. तर शिक्षक व इतर साक्षीदार यांनी असा काही प्रकार झालेला नसुन मुले बेशिस्त वागल्यामुळे प्राध्यापक श्री. अमित मोरे सरांनी त्यांना हाताने मारून शिस्तीबददल ओरडले असल्याचे सांगितले आहे. तसेच सर्व विदयार्थ्यांनी प्राध्यापक श्री. अमित मोरे यांचेविरुध्द पोलीसांकडुन कारवाई करण्यास विरोध केला आहे.
5. शिक्षा झालेल्या विदयार्थ्यांचे व कॅम्पमध्ये सहभागी असलेल्या सर्व विदयार्थ्यांच्या वयाची पडताळणी केली असता, त्यामध्ये कोणताही विदयार्थी अल्पवयीन असल्याचे आढळून आले नाही.
6. सोमय्या कॉलेजच्या मुलांसोबत घडलेली सदरची घटना ही सोमय्या आर्युवेदीक हॉस्पीटल, धुंदलवाडी, डहाणु, जि. पालघर येथे घडली आहे.
7. सदर घटनेतील साक्षीदार यांनी सदरची शिक्षा विदयार्थ्यांनी केलेल्या बेशिस्त वर्तनाबाबत दिलेली असुन ती पुर्वग्रहीत/नियोजित नसल्याचे सांगितले आहे.

8. शिक्षा झालेल्या विदयार्थ्यामध्ये कोणत्याही मुलीचा समावेश नाही. "

3. Thus with such crystal clear findings on record, we don't think any further intervention is warranted, therefore following order;

"ORDER"

a) Present suo motu case stands closed and disposed off with no order as to cost.

| | |
|---|---|
| Sd/- | sd/- |
| **(M.A. Sayeed)** | **(Justice K. K. Tated)** |
| **Member** | **Chairperson** |